आदमीः ज्याने दोन मित्र पुन्हा जोडले



आदमीच्या एका दृश्यात मनोजकुमार आणि वहिदा रेहमान



ए. भीमसिंग आणि राजेश खन्ना

दिलीपकुमार आणि ओमप्रकाश या दोघांमधील मैत्री आणि शत्रुत्वाच्या खेळात आदमीने महत्त्वाची भूमिका बजावली.

□ इसाक मुजावर



गोपीमध्ये फरिदा, सायरा, ललिता पवार आणि दिलीपकुमार

अभिनेता ओमप्रकाश-दिलीपकुमार एकमेकांचे मित्र होते आणि एक नंबरचे शत्रूदेखील. त्या दोघांचं शत्रुत्व व मैत्रीची कहाणी जाणून घेण्यासाठी आपल्याला १९५१च्या फिल्मीस्तानच्या *शबिस्तान*पर्यंत मागे जावं लागेल. *शबिस्तान*चा नायक श्याम याचं चित्रणाच्या वेळी घोड्यावरून पडून अपघाती निधन झालं. तो ओमप्रकाशचा जवळचा मित्र होता. श्यामच्या अंत्ययात्रेला चित्रपट व्यावसायिकांची अलोट गर्दी लोटली होती. ओमप्रकाश त्यांच्यातलाच एक होता. त्या गर्दीतून वाट काढत एक तरुण त्याच्यासमोर आला आणि त्याला म्हणाला, 'मी दिलीपकुमार, आपला एक चाहता आहे. *चमन* या पंजाबी चित्रपटातील आपली भूमिका मला अतिशय आवडली होती.' हे ऐकून ओमप्रकाश दिलीपकुमारच्या चेहऱ्याकडे आ वासून पाहतच राहिला. कारण श्यामची अंत्ययात्रा ही काही कौतुक करण्याची जागा नव्हती.


दिलीपकुमार व ओमप्रकाश या दोघांची पहिली ओळख ही अशी झाली. १९५३च्या रमेश सायगल यांच्या *शिकस्त* या चित्रपटात ते पहिल्यांदा एकत्र आले. *शिकस्त*च्या दरम्यान त्या दोघांच्या ओळखीचं रूपांतर मैत्रीत झालं. त्यानंतर १९५५च्या मद्रासच्या एस.एम.एस. नायडू यांच्या *आझाद* या चित्रपटात ते पुन्हा एकत्र आले आणि या

चित्रपटाच्या चित्रणाच्या वेळी *शिकस्त*च्या काळात जमलेल्या त्यांच्या मैत्रीला एकदम ग्रहण लागले. दोघेही *आझाद*मधील आपापल्या भूमिकेचं महत्त्व जोपासू लागले. यातून सेटवर त्या दोघांत वारंवार तू तू मैं मैंचा ड्रामा होऊ लागला. *आझाद*मधील आपापली भूमिका त्या दोघांनी कशीबशी पूर्ण केली. पण त्यानंतर एकमेकांकडे त्यांनी अशी काही पाठ फिरवली की एकमेकांबरोबर भूमिका करण्याची गोष्ट तर दूर राहो, एकमेकांबरोबर बोलणंदेखील त्यांनी बंद केलं. त्यांच्या मैत्रीत एक दरी निर्माण झाली. १९६८च्या सुमारास त्या दोघांच्या मैत्रीतील ही दरी अचानक कमी झाली. *आझाद*नंतर पंचवीस वर्षांनी १९७०च्या *गोपी*त ते पुन्हा एकत्र आले आणि एकमेकांच्या गळ्यात गळा घालून फिरू लागले. अनेकांच्या दृष्टीने हा एक चमत्कारच होता.

याचं श्रेय १९६८च्या *आदमी*ला द्यायला पाहिजे. दिलीपकुमार त्यात आकस्मिकपणे अपंग होणारा नायक बनला होता. त्यावेळी ओमप्रकाश मद्रासच्या हिंदी चित्रपटातच प्रामुख्याने भूमिका करायचा. एकदा मद्रासच्या मुक्कामात त्याने *आदमी*ची ट्रायल पाहिली. ती पाहत असताना नायकाला एकदम अपंगत्व येतं त्या प्रसंगात दिलीपकुमारने केलेला अभिनय पाहून तो इतका भारावून गेला की त्याच्याशी धरलेल्या शत्रुत्वाचा त्याला एकदम विसर पडला. त्याने सरळ मुंबईला दिलीपकुमारचा फोन नंबर फिरवला आणि *आदमी*तील त्याच्या भूमिकेचं कौतुक करीत बराच वेळ बोलत राहिला. हे कौतुक ऐकून दिलीपकुमारही मागचं विसरून गेला आणि *गोपी*त ते पुन्हा एकत्र आले. *आदमी*साठी दिलीपकुमारला कोणताही ॲवॉर्ड मिळाला नाही, पण ओमप्रकाशसारखा हरवलेला मित्र पुन्हा मिळवून दिला.

*आदमी*त दिलीपकुमारची नायिका होती वहिदा रहमान. तिच्या आधी वैजयंतीमालाबरोबर त्याची जोडी चांगली जमली होती. पण *लीडर*नंतर ही जोडी तुटली. वहिदा याच काळात दिलीपकुमारच्या रुपेरी जीवनात आली. १९६६चा ए. आर. कारदार यांचा *दिल दिया दर्द लिया* त्या दोघांचा पहिला चित्रपट. त्यानंतर *राम और श्याम* व *आदमी* या दोन चित्रपटांत ते एकत्र दिसले. इतकंच नाही तर १९८४च्या *मशाल* या चित्रपटात चरित्र भूमिकेतही ही जोडी दिसली.


रफी


नौशाद

*आदमी*त दिलीपकुमारबरोबर दुसरा नायक होता मनोजकुमार. आधी ही भूमिका धर्मेंद्र करणार होता, पण नंतर त्याच्या जागी मनोजकुमार आला. तो दिलीपकुमारचा फॅन होता. त्याचं खरं नाव हरीकृष्ण गोस्वामी. चित्रपटात आल्यावर आपलं हे खरं नाव बदलून त्याने मनोज नाव घेतलं ते दिलीपकुमारच्या १९४९च्या *शबनम*वरून. त्यात दिलीपकुमारच्या नायकाचं नाव मनोज होतं. दिलीपकुमारबरोबर भूमिका करायची हे त्याचं एक स्वप्न *आदमी*त साकार झालं. त्यानंतर १९८१च्या *क्रांती*मध्ये दिलीपकुमारबरोबर काम करतानाच त्याने त्याला दिग्दर्शनदेखील दिलं. सिम्मी या चित्रपटात मनोजची नायिका होती. प्राण, सुलोचना, उल्हास, पद्मा चव्हाण, मोहन चोटी, आगा शिवराज हे त्यातील अन्य कलाकार होते. ए. भीम सिंग या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. ते मद्रासलाच दिग्दर्शक बनले आणि तेथे निर्माण होणाऱ्या तामिळी व हिंदी चित्रपटांचं दिग्दर्शन त्यांनी केलं. यामुळे अनेक लोक त्यांना दाक्षिणात्य समजतात. पण ते पंजाबी होते. मद्रासलाच ते लहानाचे मोठे झाल्यामुळे त्यांच्यावर संस्कार झाले ते दाक्षिणात्य. त्या संस्कारांनीच मद्रासच्या चित्रपटात त्यांनी आघाडीच्या दिग्दर्शकाचं स्थान मिळवलं होतं आणि साठ-सत्तरच्या दशकात बॉक्स ऑफिसवरील हिट दिग्दर्शकाचं स्थान दक्षिणेत त्यांना मिळालं होतं.

नौशाद *आदमी*चे संगीतकार होते आणि गीतकार शकील बदायूनी. रफीचा आवाज त्याकाळात दिलीपकुमारचा आवाज होता. *आदमी*तील 'मैं टुटी हुई इक नैया हूं...', 'तेरी मुहब्बत पे शक नही...', 'न आदमी का कोई भरोसा...', आणि 'आज पुरानी राहो से...' ही दिलीपकुमारची तीन गाणी रफीने गायली होती. *आदमी* पडद्यावर आला तेव्हा दिलीपकुमारच्या धूसर झालेल्या ट्रॅजेडी किंगच्या प्रतिमेला *आदमी*ने एक नवा उजाळा दिला. यामुळेच या चित्रपटात रफीने त्याच्यासाठी गायलेल्या तीनही गाण्यांना ट्रॅजेडी साँगचा रंग आला होता.

आपल्या चित्रपट संगीतात द्वंद्वगीतांची एक परंपरा आहे. या परंपरेतील द्वंद्वगीत आपल्या चित्रपटात प्रामुख्याने असतात ती नायक-नायिकेच्या तोंडी. पण *आदमी*चं संगीत याला अपवाद होतं. या चित्रपटात नायक-नायिकेच्या तोंडी एकही द्वंद्वगीत नव्हतं. 'कैसी हसीन आज बहारों की रात है...' हे द्वंद्वगीत दिलीपकुमार आणि मनोजकुमार या दोघांवर चित्रीत करण्यात आलं होतं. या गीतात दिलीपकुमारला रफीचा तर मनोजकुमारला महेंद्र कपूरचा आवाज दिला होता. पण हे गाणं रेकॉर्ड झालं तेव्हा गाण्यात तलत महेमूदचा आवाज होता. नौशादनी रफी व तलत यांच्या आवाजात हे गाणं रेकॉर्ड केलं होतं. पण *उपकार*नंतर महेंद्र कपूरचा आवाज मनोजकुमारच्या पसंतीचा आवाज बनला होता. यामुळे *आदमी*त त्याचं गाणं तलतने गायलेलं असतानादेखील तो महेंद्र कपूरच्या आवाजासाठी अडून बसला. यामुळे नौशादना या चित्रपटातील 'कैसी हसीन आज बहारों की रात है...' हे गाणं पुन्हा रफी व महेंद्र कपूर यांच्या आवाजात रेकॉर्ड करावं लागलं. त्या दोघांच्या आवाजातच हे गाणं चित्रपटात आलं. पण या गाण्याच्या रेकॉर्डवर मात्र महेंद्र कपूरचा आवाज आला नाही. कारण त्या आधीच या गाण्याची रेकॉर्ड रफी व तलत यांच्या आवाजात निघाली होती. या चित्रपटातील 'कारी बदरिया मारो लहरिया मोरा जिया उड जायेगा...' व 'कल के सपने आज ना आना...' ही दोन गाणी लताबाईंनी गायली होती.

१९६८च्या *आदमी*च्या आधी *आदमी* नावाचे दोन चित्रपट आले होते. त्यापैकी १९५७च्या *आदमी*त दिलीपकुमारचा छोटा भाऊ नासिर खान नायक होता. हा *आदमी* चालला नव्हता. दिलीपकुमारचा *आदमी*ही फारसा चालला नाही. ✯